**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**
**कर्जत, जि. रायगड**

जा.क्र.ससंसं/प्राकृसंके/**किशावि**/ 948 /२०२३ दिनांक : 11 MAY 2023

**जाहिर प्रसिध्दी**

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्राशी संबंधित संशोधनात्मक आणि शेतीविषयक कामे खरीप २०२३ या हंगामात करावयाची आहेत. कामाची यादी सोबत जोडली आहे. सदरची कामे ०१ जून, २०२३ ते ३० नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत करावयाची आहेत. ही कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने करावयाची आहेत. सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या कंत्राटदारांनी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक २६/०५/२०२३ पर्यंत किंवा त्या पुर्वी सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

**सहयोगी संशोधन संचालक**
**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र**
**ता. कर्जत, जि. रायगड**

**प्रत : प्रसिध्दीसाठी**

१ नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि सेशोधन केंद्र, जि. रायगड.
२ डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली संकेतस्थळ
३ मा. कार्यकारी अधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.
४ मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.
५ ग्रामपंचायत, हालीवली, किरवली यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील** किटकशास्त्राशी संबंधित **शेतीविषयक आणि** प्रयोगाशाळेतील **प्रायोगिक** कामे ठेका पद्धतीने करावयाचे दरपत्रक

दि.

प्रती,

**मा.सहयोगी संशोधन संचालक,**
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत—४१०२०१, जिल्हा—रायगड.

विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागातील प्रक्षेत्रावरील शेतीविषयक **आणि** प्रयोगशाळेतील **प्रायोगिक** कामे ठेका पद्धतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

संदर्भ : जा.क्र.ससंसं/प्राकृसंके./किशावि/ /२०२३, दि.

आपल्या वरील संदर्भित जाहीर प्रसिद्धी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जतमधील किटकशास्त्राशी संबंधित शेतीविषयक **आणि** प्रयोगाशाळेतील **प्रायोगिक कामे** ठेका पद्धतीने करण्यासाठीचे दरपत्रक खालील प्रमाणे.

| कामाचा तपशील | किटकशास्त्राशी संबंधित खरीप २०२३ हंगामासाठी (माहे ०१ जून, २०२३ ते ३० नोव्हेंबर, २०२३) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये दिलेल्या शेतीविषयक **आणि** प्रयोगाशाळेतील प्रयोगाच्या कामाचे दरपत्रक | रूपये.........<br>अक्षरी.......... |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही :.......................................

नांव :.......................................

पत्ता :.......................................

## कंत्राटी कामाच्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे

१. या केंद्रावरिल किटकशास्त्रज्ञ यांच्या सुचनेप्रमाणे प्रक्षेत्रावरील आणि प्रयोगाशाळेतील **प्रायोगिक कामे** करावयाची आहेत.

२. प्रक्षेत्रावर शेतीची कामे करताना विद्यापीठ परिपत्रक क्रमांक डॉबासाकोकृषि/आस्था/ब–६/६२८७/२०१७ दि. २५.०७.२०१७ कंत्राटी मजुरांना द्यावयाच्या सर्व सोयी सुविधा पुरविण्याबाबतचे प्रमाणपत्र देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३. प्रक्षेत्रावरील प्रयोगाची कामे करताना व प्रयोगशाळेमध्ये कामे करतांना कोणतीही इजा व जखम किंवा अन्य काही झाल्यास सदरची जबाबदारी ठेका घेणाऱ्यांची राहील.

४. शासनाने निर्गमित केलेले आयकर व तत्समकर बिला मधून परस्पर वजा केले जातील.

५. ठेकेदारांची कामाची वेळ सकाळी ९.०० ते.सायंकाळी ५.३० अशी राहील सकाळचे किंवा दुपारचे सत्रात ठेकेदार/मजूर गैरहजर राहील्यास अर्धा युनिट काम केले आहे असे समजण्यात येईल व त्यानुसार रक्कम देय राहील.

६. प्रत्येक महिन्याचे किती मजुर आवश्यकता आहे याची माहिती ज्या त्या वेळी देण्यात येईल.

७. ठेकेदाराने कंत्राटी कामाचे बिल प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला सादर करावयाचे आहे. बिल उशिरा सादर केल्यास त्याप्रमाणे विलंब होईल.

८. प्रक्षेत्रावरील व प्रयोगाशाळेतील प्रयोगाची कामे व त्या अनुषंगाने येणारी कामे वेळच्यावेळी पुर्ण करण्याची जबाबदारी संबधित ठेकेदारीची राहील.

९. वरील ठेका माहे ०१ जून, २०२३ ते ३० नोव्हेंबर, २०२३ करीता मर्यादित असेल.

१०. काम समाधानकारक न आढळल्यास अथवा कामामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष व्यत्यय आणल्यास ठेका रदद् करण्यात येईल.

११. सदर कामे ही निव्वळ कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याने कोणत्याही व्यक्तीस विद्यापिठाच्या सेवेत घेण्याबाबतचा हक्क असणार नाही.

वरील अटी शर्ती एकतर्फी नसून मला त्या मान्य आहेत.

सही :.......................................

नांव :.......................................

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्राशी संबंधित कामे**
(माहे ०१ जून, २०२३ ते ३० नोव्हेंबर, २०२३) **या कालावधीत ठेका पद्धतीने**

**करावयाच्या कामाची यादी**

१ चाचणी प्रयोगाच्या **विविध वाणांसाठी असणाऱ्या** शेकडो लाकडी **पटटया** साफ करून रंगविणे.
२ खरीप हंगामातील प्रयोगांच्या विविध वाणांसाठी असणाऱ्या पटटयांवर अनुंक्रमाक टाकणे.
३ सदर पटट्यांची प्रक्षेत्रावर वाहतुक करणे.
४ पेरणी करण्यासाठी वाफे तयार करणे.
५ खरीप–२०२३ हंगामातील MSCRIP, AICRIP आणि एजन्सी प्रयोगांतर्गत विविध भात जातींचे भात बियाणे (Culture) यांचे खरीप २०२३ करीता पेरणीसाठी सेट तयार करून Cultures छोट्या पाकिटामध्ये बंद करून त्यांना नोंदणी क्रमांक देणे.
६ वाफ्यांवर भाताची पेरणी करणे.
७ पेरणीच्या वेळी वाफ्यामध्ये शेणखत टाकुन बुजवुन घेणे.
८ वाफ्यामध्ये बी रूजुन येईपर्यत राखण करणे.
९ रोपवाटीकेमध्ये खतांची मात्रा देणे.
१० विविध वाणांच्या तसेच एजन्सी प्रयोगाच्या रोपवाटीकेतील तणांची बेणणी करणे.
११ विविध वाणांच्या चाचणी प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बांध साफसफाई करणे.
१२ लावणी करण्यासाठी प्रक्षेत्राची मशागत करणे.
१३ प्रयोगांच्या लावणीसाठी प्रक्षेत्रावर ले–आऊट टाकण्यास मदत करणे.
१४ प्रयोगांची लावणी करणे.
१५ प्रक्षेत्रांमध्ये उगवुन येणाऱ्या तणांची बेणणी करणे.
१६ लागवडीनंतर त्यांना दिशा दर्शक बोर्ड लावणे.
१७ चाचणी प्रयोगाच्या कुंपणाच्या बाजुची झाडे तोडणे.
१८ लावणी केलेल्या प्रक्षेत्रांमध्ये वेळोवेळी खतांची मात्रा देणे.
१९ विविध वाणांच्या तसेच एजन्सी प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बेणणी करणे.
२० विविध प्रयोगांच्या नोंदवह्या आखणे.
२१ प्रक्षेत्रावरील प्रयोगांची वेळोवेळी निरीक्षणे घेण्यास मदत करणे.
२२ प्रयोगशाळेत करावयाच्या प्रयोगांचे सेट लावणे.
२३ प्रयोगशाळेत करावयाच्या प्रयोगांची वेळोवेळी निरीक्षणे घेण्यास मदत करणे.
२४ MSCRIP, AICRIP एजन्सी कल्चर्स् व प्रयोगशाळेती प्रयोगांचा प्रायोगिक डाटा संगणकावर भरण्यास मदत करणे.
२५ प्रकाशसापळ्यात अडकलेल्या किडी दररोज गोळा करणे.
२६ प्रक्षेत्रातील प्रयोगांची कापणी करणे.
२७ प्रयोगांची कापणी केल्यानंतर त्याची झोडणी करणे.
२८ पेंढ्याचे भारे बांधणे व पेंढ्याची तसेच भाताची वजने घेणे.
२९ प्रयोगशाळेतील स्प्रेअर्स, डस्टर्स इत्यादी उपकरणे स्वच्छ करणे.
३० ऐनवेळी उद्‌भवणारी सर्व कामे करणे.

**किटकशास्त्रज्ञ**
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड